# पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा
## सातारा तालुका पोलीस ठाणे जि.सातारा
फोन नं.०२१६२-२३८६०७
Email id-
sataratps.satara@mahapolice.gov.in


---

## प्रेसनोट दिनांक- १८/११/२०२५

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक आचारसंहिता कालावधीमध्ये सातारा तालुका पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण शाखेची मोठी कारवाई अग्निशस्त्र बाळगणा-या आरोपींना केले जेरबंद

**(अग्निशस्त्रे (०२ पिस्टल) व मोटार सायकल असा एकुण १,२०,०००/- रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत)**

सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक आचारसंहिता सुरु असुन मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो, सातारा शहर विभाग,सातारा यांनी अवैध्य अग्निशस्त्र बाळगणारे इसमांचा शोध घेऊन त्यांचेवर कारवाई करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

त्याप्रमाणे दि.१७/११/२०२५ रोजी मा.पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांनी अशा इसमांचा शोध घेणेची मोहिम राबविली होती. त्यातच त्यांना त्यांचे खास गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अमर हॉटेल वाढेफाटा सातारा येथे एक इसम मोटार सायकल वर असुन त्याचेकडे पिस्टल सारखे अग्निशस्त्र आहे. त्यास ताब्यात घेवुन त्याचेवर कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने व मिळाले गोपनीय बातमीच्या अनुषंगाने अमर हॉटेल वाढेफाटा सातारा जाणारे रोडवर गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असताना मिळाले बातमीच्या वर्णनाचा एक इसम त्याचेकडील मोटार सायकलवर संशयितरित्या बसलेला दिसला. त्याचेजवळ जावुन त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात एक देशी बनावटीचे पिस्टल मिळुन आले.त्याबाबत त्याचेकड़े कोणताही अधिकृत परवाना नसल्याची बाब समोर आली. नमुद आरोपीकडे अधिक चौकशी करता त्याने सदरचे पिस्टल हे दुस-या एका इसमाकडुन आणले असल्याचे सांगितले. त्यामुळे नमुद दुस-या संशयित इसमाचा ठावठिकाणा प्राप्त करुन त्यास देखिल ताब्यात घेण्यात आले. सदर दोंन्ही आरोपीकडे अधिक चौकशी करुन त्यांचेकडे असलेले पिस्टल याबाबत कोणताच परवाना नसल्याचे दिसुन आलेने दोन्ही इसमांना चौकशीकामी ताब्यात घेऊन पोलीस ठाणेस आणुन त्यांचेवर गुन्हा दाखल करणेत आला.

दरम्यान गुन्ह्याचा तपास करीत असताना सदर अग्निशस्त्र हे कोठुन आणले याबाबत विचारपुस करीत असताना आणखी एक इसमाचे नाव समोर आले.त्यामुळे सदर निष्पन्न इसमाचा देखिल कौशल्यपुर्वक शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे आणखी एक पिस्टल (अग्निशस्त्र) मिळुन आले. अशा प्रकारे सातारा तालुका पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी स्थानिक

स्वराज्य संस्था निवडणुक आचारसंहिता कालावधी दरम्यान ६०,०००/- रुपये किंमतीची **०२ अग्निशस्त्रे (पिस्टल)** व आरोपींकडील ६०,०००/- रु.किंमतीची मोटार सायकल असा एकुण १,२०,०००/- रु.किंमतीचा मुदेमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधिक्षक श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.राजीव नवले, पोलीस निरीक्षक श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी सपोनि श्री.विनोद नेवसे ,पोउनि श्री.सोनु शिंदे व पोलीस अंमलदार दादा स्वामी, मनोज गायकवाड, पंकज ढाणे, राजु शिखरे,प्रदिप मोहिते, मालोजी चव्हाण, संदिप आवळे, दप्तरी सतीश बाबर, प्रविण वायदंडे, सुनिल भोसले यांनी केली आहे.

सदर कारवाईमध्ये सहभाग घेणारे अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस अधीक्षक सो,सातारा व मा.अपर पोलीस अधीक्षक सो,सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

**प्रति,**

**सर्व वृत्तपत्र संपादक सातारा**